**अर्ज निशाणी ५४ खालील आदेश**

(CNR MHSI080006512019)

०१. सदर अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.८ यांनी त्यांचे विरुध्द झालेला ''एकतर्फा'' आदेश रद्द करुन, त्यांची कैफीयत दाखल करून घेण्यासाठी परवानगी मिळणेस विनंती केली आहे. वादीतर्फे दाखल केलेले नि.क्र.५७ वर म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचे युक्तिवाद ऐकले.

०२. प्रतिवादी क्र.८ यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी हे न्यायालयात हजर न राहिल्याने दि.०९/०६/२०२३ रोजी त्यांचेविरुध्द एकतर्फा आदेश करण्यात आला आहे. प्रतिवादी हे वयोवृध्द असून आजारी असतात. त्यामुळे दाव्याचे समन्स प्राप्त झाल्यानंतर प्रतिवादी हे आजारी असल्यामुळे त्यांना रत्नागिरी येथून कणकवली येथे येणे शक्य झाले नाही. सबब, प्रतिवादी विरुध्द एकतर्फा आदेश झालेला आहे. प्रतिवादीविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. सदर आदेश रद्द न झाल्यास प्रस्तूत प्रतिवादीस आपली बाजु मांडण्याची संधी मिळणार नाही. पुढे त्यानी अशी विनंती केली आहे की, त्याच्याविरुध्द झालेला एकतर्फा आदेश बाजुला सारुन त्यांना कैफियत दाखल करणेची परवानगी देण्यात यावी.

०३. वादीने आपले म्हणणे नि.क्र.५७ वर दाखल करुन प्रस्तूत अर्जास प्रखर विरोध दर्शविला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, वादी यांनी सदरचा दावा २०१९ मध्ये

21/11/23
CJJD.

दाखल केला आहे. सदरचा दावा दाखल करुन प्रतिवादी यांना समन्स लागू होऊन देखील ते आज अखेर कोर्टात हजर झाले नव्हते. प्रस्तूत प्रकरणातील वादी या विधवा महिला असून त्यांनी त्यांचा हक्क या दाव्याच्या कामी मागणी केलेला आहे. प्रतिवादी यांनी मुळातच आपली कैफियत देण्यास चार वर्षाचा विलंब केलेला आहे व तो विलंब कायद्यास अभिप्रेत नाही. त्यांच्या अर्जातील कथनेच त्यास कारणीभूत आहेत. सबब प्रतिवादी क्र. ८ यांचा नि.क्र.५४ वरील अर्ज हा रक्कम रु.१०,०००/- इतक्या दंडानिशी नामंजूर करणेत यावा.

०४. सदर दावा वादीने दावा मिळकतींचे वाटप होणेकरीता व ठरावाकरीता दाखल केला आहे. वादीने असे कथन केले आहे की, दावा मिळकती त्यांचे पती व प्रतिवादींच्या वाडवडिलार्जित सामाईक प्रत्यक्ष मालकी व कब्जेवहिवाटीच्या मिळकती आहेत. त्यामुळे वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.८ हे प्रस्तूत दाव्याकरीता आवश्यक पक्ष आहे. अशा परीस्थितीत प्रतिवादी क्र.८ यांचेविरुध्द पारीत करण्यात आलेला दि.०९/०६/२०२३ रोजीचा एकतर्फा आदेश बाजूला सारुन त्यांना कैफियत दाखल करणेची संधी देणे नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने योग्य होईल. त्यामुळे, प्रतिवादी क्र.८ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास सर्व निर्णायक वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. तसे न केल्यास त्यांचे अपरीमित नुकसान होण्याची शक्यता आहे. प्रतिवादी क्र.८ यांचेकडून झालेल्या विलंबाची नुकसान भरपाई म्हणून वादीला खर्च देण्याबाबत आदेश पारीत करणे न्यायाचे होईल. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. करीता, खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

21/11/23
CJJD.

नि.दि.दा.क्र.४३/२०१९
शैलजा वि. अफसाना व इतर

## :: आदेश ::

१. निशाणी क्र.५४ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.८ यांचेविरुध्द दि.०९/०६/२०२३ रोजी पारीत केलेला एकतर्फा आदेश बाजुला सारण्यात येत आहे व त्यांना आपली कैफियत दाखल करणेची परवानगी देण्यात येत आहे.

३. प्रतिवादी क्र.८ यांनी खर्च म्हणुन रक्कम रु.७००/-(रूपये सातशे फक्त) वादीस द्यावेत.

४. आदेशाची पुर्तता पुढील तारखेपर्यत न केल्यास आदेश आपोआप रद्द झाल्याचे समजावे.

दिनांक – २१/११/२०२३

(टी.एच.शेख)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
कणकवली.